## प्रेस नोट

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

दि.१६.०३.२०२३

आलोसे क्रं. १)जयंत पुडंलीक भट, वय–५१, नायब तहसिलदार, तहसिल धरणगांव, धरणगांव जि.जळगांव रा.काळकर गल्ली, एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव **(खाते महसुल वर्ग–२)** व आलोसे क्रं. २) राहुल नवल शिरोळे, वय–३०, कोतवाल,तलाठी कार्यालय,पाळधी जि.जळगांव.**(खाते महसुल वर्ग–४)** यांचेपैकी आलोसे क्रं.२ यांना २५,०००/–रु. लाच रक्कम स्वत: स्वीकारली म्हणुन गुन्हा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव. |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | :– | धरणगांव पो.स्टे. गु.र.नं.७९/२०२३ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ व १२ प्रमाणे. |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | **१)**जयंत पुडंलीक भट, वय–५१, नायब तहसिलदार, तहसिल धरणगांव, धरणगांव जि.जळगांव रा.काळकर गल्ली, एरंडोल ता.एरंडोल जि.जळगांव. **(खाते महसुल वर्ग–२)** **२)** राहुल नवल शिरोळे, वय–३०, कोतवाल,तलाठी कार्यालय,पाळधी रा. महाराणा प्रताप चौक, पाळधी ता.धरणगांव जि.जळगांव.**(खाते महसुल वर्ग–४)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.१६/०३/२०२३ रोजी प्रथम ३०,०००/–रु. लाचेची मागणी केली आहे. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | २५,०००/– रुपये. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.१६/०३/२०२३ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील फिर्यादी व त्यांचे मोठे भाऊ यांचा जळगांव शहरात मटेरीयल सप्लायर्स व कन्स्ट्रक्शनचा व्यवसाय आहे. सदर व्यवसायासाठी फिर्यादी यांचे मोठे भावाचे नावावर दोन ढंपर वाहन क्र. एम.एच.१९ वाय ९१७१ व एम.एच.१९ झेड ९१७१ असे आहेत. सदरचे दोन्ही ढंपरव्दारे ते बांधकाम व्यवसायासाठी लागणारे बिल्डींग मटेरीयलची व गिरणा नदी पात्रातुन वाळुची वाहतुक करित असतात.दि.०१.०३.२०२३ रोजी रात्री ०१.०० वा.चे सुमारास आलोसे क्र.१ व आलोसे क्र.२ यांनी ढंपर क्र.एम.एच. १९ वाय ९१७१ हा वाळुने भरलेला ढंपर बांभोरी गावाजवळ पकडुन ३०,०००/– रू घेवुन सदरचा ढंपर सोडुन दिला होता. त्यानंतर पुन्हा दि.११.०३.२०२३ रोजी सकाळी ०५.०० वा.चे.सुमारास आलोसे क्र.१ यांनी ढंपर क्र.एम.एच.१९ झेड ९१७१ हा वाळुने भरलेला ढंपर बांभोरी गावाजवळ पकडुन २३,०००/– रू घेवुन सदरचा ढंपर सोडुन दिला होता.<br>सदरवेळी आलोसे क्र.१ जयंत पुडंलीक भट, नायब तहसिलदार यांनी फिर्यादी व त्यांच्या भावास त्यांचे ढंपरद्वारे वाळुची सुरळीत वाहतुक करु देण्याचे मोबदल्यात एका ढंपरचे १५,००० /–रू प्रमाणे दोन ढंपरचे ३०,०००/– रू दयावे लागतील असे सांगुन फिर्यादी व त्यांच्या भावास पाळधी येथील कोतवाल राहुल शिरोळे यांना भेटण्यास सांगितले होते.<br>आलोसे क्र.१ यांचे सांगणेप्रमाणे दि.१५.०३.२०२३ रोजी फिर्यादी व त्यांचा मोठा भाऊ असे आलोसे क्र.०२यांना पाळधी येथे जावुन भेटले असता त्यांनी फिर्यादी व त्यांच्या भावास आलोसे क्रं.१ यांनी मला तुमच्याकडील दोन ढंपरचे मासिक ३०,०००/– रू घेण्यास सांगितले असे सांगीतले. सदरबाबत फिर्यादी यांनी दि.१६.०३.२०२३ रोजी नायब तहसिलदार भट व कोतवाल राहुल शिरोळे यांच्याविरूध्द अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची दि.१६.०३.२०२३ रोजी ला.प्र.वि.जळगांव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष पडताळणी केली असता यातील आलोसे क्रं.१ व २ यांनी फिर्यादी यांचेकडेस त्यांच्या भावाच्या नावावर असलेले वरील दोन्ही ढंपरद्वारे सुरळीत वाळु वाहतुक करू देण्यासाठी व सदर ढंपरवर कोणतीही कारवाई न करण्याच्या मोबदल्यात प्रथम ३०,०००/–रू व तडजोडीअंती २५,०००/–रु.लाच रकमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आलोसे क्र.१ यांनी आलोसे क्रं.२ यांचेकडे देण्यास सांगुन, अपराधास सहाय्य करुन प्रोत्साहन दिले. त्यानंतर आलोसे क्र. १ यांचे सांगणेप्रमाणे आलोसे क्रं.२ यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष २५,०००/–रु.लाच रक्कम स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री क्रमांक:–** 1064,दुरध्वनी **क्रमांक:–**0257-2235477

**व्हॉटस्‌ॲप क्रमांक:–** 8766412529

१६.३.२०२३

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**